# स्वारस्य अभिव्यक्ती आमंत्रण सूचना

दि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन **("विफा")** (ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशनशी संलग्न), जिची स्थापना १९११ मध्ये झाली असून जी महाराष्ट्र राज्यातील सर्वोच्च फुटबॉल संस्था म्हणून मान्यताप्राप्त आहे, महाराष्ट्रातील क्रीडा पायाभूत सुविधा आणि क्रीडा विकास, विशेषतः फुटबॉलचे आधुनिकीकरण व उन्नयन करण्यासाठी सिद्ध आर्थिक सामर्थ्य, तांत्रिक क्षमता आणि एक अद्‌वितीय दूरदृष्टी असलेल्या प्रतिष्ठित कॉर्पोरेट कंपन्या, पायाभूत सुविधा विकासक, क्रीडा व्यवस्थापन कंपन्या, व्यावसायिक समूह, सीएसआर फाऊंडेशन्स यांच्याकडून स्वारस्य अभिव्यक्ती **("ईओआय)** आमंत्रित करत आहे. यामध्ये राज्याच्या दुर्गम भागांतील क्रीडा विकासावर योग्य लक्ष केंद्रित करणे अपेक्षित आहे.

संपूर्ण महाराष्ट्र राज्यात क्रीडा पायाभूत सुविधांचा आणि विशेषतः फुटबॉलचा सर्वांगीण विकास व बळकटीकरण करण्यासाठी, **विफा** एका योग्य धोरणात्मक भागीदाराची / सहयोग्याची निश्चिती करू इच्छिते.

आपला प्रस्ताव सादर करण्यास इच्छुक असलेल्या पक्षांना काही विशिष्ट पात्रता निकष पूर्ण करणे आवश्यक आहे, ज्यामध्ये इतर गोष्टींबरोबरच भक्कम आर्थिक क्षमता आणि व्यावसायिक प्रतिष्ठा, संस्थात्मक किंवा इतर मोठे प्रकल्प उभारण्याचा यशस्वी इतिहास, आणि फुटबॉलसह खेळांप्रति दृढ वचनबद्धतेसह सीएसआर उपक्रम यांचा समावेश आहे.

उद्दिष्ट्ये, व्याप्ती, पात्रता इत्यादींचा तपशील असलेली संबंधित कागदपत्रे **("प्रस्ताव दस्तऐवज")** विफाच्या कूपरेज फुटबॉल स्टेडियम, महर्षी कर्वे रोड, मुंबई ४०००२१, महाराष्ट्र, भारत येथील कार्यालयातून, **'दि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन'** च्या नावे आणि मुंबई येथे देय असलेला, कोणत्याही अनुसूचित बँकेवर काढलेला रु. १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) रकमेचा डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर सादर करून, कोणत्याही दिवशी दुपारी १२ ते सायंकाळी ४ या वेळेत मिळवता येतील. सदर रु. १,००,०००/- ही रक्कम अप्रतिदेय असेल. केवळ **'दि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन'** च्या नावाने काढलेले डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डरच स्वीकारले जातील आणि भरणा करावयाचीची इतर कोणतीही पद्धत स्वीकारली जाणार नाही. प्रस्ताव दस्तऐवज स्वीकारण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तीने, ज्या पक्षाच्या वतीने प्रस्ताव दस्तऐवज स्वीकारले जात आहेत, त्या पक्षाच्या लेटरहेडवर एक प्राधिकार पत्र सादर करावे. तसेच, केवळ तोच पक्ष प्रस्ताव सादर करण्यास पात्र असेल, ज्याच्या वतीने प्रस्ताव दस्तऐवज स्वीकारले जात आहेत.

ज्या पक्षांनी प्रस्ताव दस्तऐवज घेतले आहेत आणि आपला प्रस्ताव सादर करण्यास इच्छुक आहेत, त्यांना त्यांचे संपूर्ण प्रस्ताव दिनांक २२/११/२०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी वर नमूद केलेल्या पत्त्यावर सादर करणे आवश्यक आहे. दिनांक २२/११/२०२६ रोजी सायंकाळी ५ वाजल्यानंतर सादर केलेला कोणताही प्रस्ताव स्वीकारला जाणार नाही. विफाला योग्य वाटेल त्या रीतीने उपरोक्त दिनांक बदलण्याचे स्वातंत्र्य आहे आणि तसे झाल्यास, त्या बदलाची सूचना या वृत्तपत्रात प्रसिद्ध करून कळवण्यात येईल.

उपरोक्त प्रस्तावानुसार कोणताही करार / कंत्राट लागू कायदे, परवानग्या, मान्यता आणि नियमांच्या अधीन असेल.

**विफा**, कोणत्याही पक्षाला कोणतेही कारण न देता, पूर्णपणे स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार, संपूर्ण प्रक्रिया समाप्त करण्याचा आणि/किंवा सर्व किंवा कोणतेही प्रस्ताव नाकारण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

दिनांक: २१/१०/२०२६

**दि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन**
समितीकरिता आणि वतीने
सही/-
अधिकृत स्वाक्षरीकर्ता